राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य, पुणे
जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे - ४११००१

सत्यमेव जयते

मधुकर चौधरी
भा. प्र. से. (से. नि.)
आयुक्त
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण

कार्यालय : ०२०-२६०५०६४१
Email : comscea.pune@maharashtra.gov.in
secscea.pune@maharashtra.gov.in


अ.शा.पत्र क्र.रासनिप्रा/सह.सं.निवडणूक/२०१४ दिनांक : ऑक्टोबर, २०१४

**विषय : राज्यातील सहकारी संस्थांच्या आगामी निवडणुका...**

राज्यातील सुमारे २ लक्ष २७ हजार सहकारी संस्थांसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० (सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४) लागू करण्यात आलेला आहे. भारतीय राज्यघटनेच्या ९७ व्या दुरुस्तीच्या पार्श्वभूमीवर सदर कायद्यामध्ये आमुलाग्र बदल होवून महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अधिनियम २०१३ (क्रमांक १६) व (क्रमांक ३१) अन्वये सुधारित कायदा अंमलात आलेला आहे. दरम्यानच्या काळात म्हणजे सुमारे २०११ पासून सहकारी संस्थांच्या निवडणूकांना राज्य शासनाने विविध कारणास्तव स्थगिती दिलेली होती. सुधारित सहकार कायद्याच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाचे जुने निवडणूक नियम निष्काषित करुन १२.०९.२०१४ च्या राजपत्राद्वारे नवीन निवडणूक नियम जारी केले आहेत.

विद्यमान महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील कलम ७३ कब(१५) अन्वये राज्यातील सर्व प्रलंबित सहकारी संस्थांच्या निवडणूका ह्या डिसेंबर २०१४ अखेर संपन्न होणे बंधनकारक असून ह्याच कायद्यातील कलम ७३ कब अन्वये ह्या निवडणूका घेण्याचे प्रयोजनार्थ राज्य शासनाने राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण गठीत कले आहे. प्रस्तृत प्राधिकरणाच्या आयुक्त पदावर शासनाने मे २०१४ मध्ये नियुक्ती केली असून प्राधिकरणाचे कामकाज सुरु झाले आहे.

सद्य:स्थितीत निवडणूका प्रलंबित असलेल्या सहकारी संस्थांची संख्या ही फार मोठी असल्याने ह्या सर्व प्रलंबित संस्थांच्या निवडणूका डिसेंबर २०१४ अखेर घेण्यासाठी फार मोठ्या मनुष्यबळाची आवश्यकता भासणार आहे. ह्या निवडणूकांसाठी प्राधिकरणास शासनाच्या कोणत्याही विभागातील अधिकारी/कर्मचारी सेवा व अन्य अनुषंगिक बाबी (जागा, वाहने,सेवा) अधिग्रहीत करण्याचे अधिकार प्राप्त आहेत. उक्त निवडणूक नियमामध्ये राज्यस्तरीय/जिल्हास्तरीय कार्यक्षेत्र असलेल्या अनेक सहकारी संस्थांचे (उदा.राज्य फेडरेशन्स, राज्य बँक, जि.म.बँक, नागरी बँक, दूध संघ, साखर कारखाने, सूत गिरण्या इ.) वर्गीकरण हे 'अ' व 'ब' प्रकारच्या संस्थांमध्ये करण्यात आलेले असून ह्या निवडणूकांमध्ये कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असल्याने पूर्वापारपासून ह्या निवडणूका घेण्याचे काम महसुल / सहकार खात्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात येत होते. अशाच

प्रकारची कार्यवाही पुढेही सुरु ठेवण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतला आहे. प्राधिकरणास जिल्हाधिकाऱ्यांकडून त्या संदर्भात पूर्ण सहकार्य अपेक्षित राहील.

सहकार विभागातील बहुतांश सर्वच क्षेत्रिय अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना ह्या निवडणूकांच्या कामासाठी पूर्णवेळ सेवा पुढील सुमारे ३ ते ४ महिन्यात देणे अनिवार्य ठरणार आहे. तथापि ह्याच कालावधीत अन्य काही निवडणूका उदा.जिल्हापरिषदा, ग्रामपंचायती इ. आल्या तर त्यांचेसाठी सहकार विभागातील अधिकारी/कर्मचारी ह्यांच्या सेवा उपलब्ध करुन देणे शक्य होणार नाही. जिल्हाधिकाऱ्यांना सूचित करण्यात येते की, अशा व तत्सम परिस्थितीत सहकार विभागाकडील कर्मचारी/अधिकारी आणि त्या विभागाची वाहने अधिग्रहीत करण्यात येवू नयेत.

फार मोठ्या संख्येने प्रलंबित असणाऱ्या अशा सर्व सहकारी संस्थांच्या निवडणूका ह्या भयमुक्त, मोकळया वातावरणात व पारदर्शक पध्दतीने संपन्न करण्याचे आव्हान प्राधिकरणासमोर असून त्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडून सहकार्याची अपेक्षा आहे.

धन्यवाद !

आपला

(मधुकर चौधरी)

मा. सचिव.

प्रति,

श्री.

जिल्हाधिकारी (सर्व)

**सोबत :-** १.राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण स्थापनेची अधिसुचना दि.३०/०६/२०१३

२.आयुक्त नियुक्तीची शासन अधिसूचना दि.१६/०५/२०१४